**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठातील सौरउर्जा प्रकल्पाचे कुलगुरुंच्या हस्ते उद्घाटन**
**सौरउर्जे द्वारे ८.५० लक्ष युनीट वीजेची होणार निर्मिती**
**अमरावतीतील सर्वात मोठा प्रकल्प**

अमरावती.

भारत सरकारच्या सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमि. या संस्थेद्वारे 'स्वच्छ भारत स्वच्छ उर्जा' प्रकल्पांतर्गत देशभरातील शासकीय विभागाच्या इमारतींवर रुफटॉप सोलर प्लँटच्या माध्यमातून नैसर्गिक वीज निर्मितीचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प स्थापित करण्याकरिता मे. क्लीन मॅक्स एनव्हायरो एनर्जी सोलुशन्स प्रा.लि., मुंबई या कंपनीशी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने करार केला आहे. विद्यापीठ परिसरातील विविध इमारतींवर सौरउर्जा प्रकल्प स्थापित होणार असून त्या प्रकल्पाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते भौतिकशास्त्र विभागात करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, व्य.प. सदस्य डॉ.एस.के. ओमनवार, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, विद्यापीठ उपअभियंता श्री राजेश एडले व्यासपीठावर उपस्थित होते.

विद्यापीठात स्थापित होत असलेल्या सौरउर्जा प्रकल्पाचे उद्घाटन कुलगुरुंचे हस्ते झाल्यानंतर ते म्हणाले, भारत सरकारच्या सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमीटेड, न्यु दिल्ली यांच्याकडे विद्यापीठातील विविध इमारतींवर सौरउर्जा प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता देवून मे. क्लीन मॅक्स एनव्हायरो एनर्जी सोलुशन्स प्रा.लि., मुंबई ही कंपनी विद्यापीठाने केलेल्या करारानुसार रु. ३.६२ प्रती युनीट याप्रमाणे विद्यापीठाला २५ वर्ष वीज उपलब्ध करुन देणार आहे. प्रकल्पाचे बाजारमूल्य ३.५० कोटीच्या आसपास असून तो संपूर्ण खर्च कंपनी स्वतः करणार आहे. सध्या विद्यापीठाला रु. ७.२० प्रती युनीट दराने वीज वितरण कंपनीकडून वीज खरेदी करावी आहे. वर्षाला १२ लक्ष युनीट वीजेची विद्यापीठाला असलेली गरज लक्षात घेता जवळपास ८.५ लक्ष युनीट वीज निर्मिती सौरउर्जा प्रकल्पातून होणार असल्यामुळे ३० लक्ष रुपयांची वर्षाकाठी बचत होणार असल्याचे ते म्हणाले.

'स्वच्छ भारत स्वच्छ उर्जा' हा महत्वाकांक्षी प्रकल्प शासनाचा असून या माध्यमातून वीज निर्मितीसाठी होणारे प्रदूषण थांबणार असून वर्षाकाठी ८३५ टन कार्बनडायऑक्साईडचे उत्सर्जन कमी होणार असल्यामुळे निसर्गाचे व पर्यावरणाचे संवर्धन विद्यापीठाच्या सौरउर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून होणार आहे. सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून समाजाच्या विकासासाठी जास्तीतजास्त प्रयत्न विद्यापीठ करीत असल्याचेही कुलगुरु म्हणाले. सौरउर्जा प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी सर्वांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांनी कौतुकही केले.

प्रकल्पाविषयी माहिती देतांना प्रास्ताविक भाषणातून विद्यापीठ उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले यांनी सांगितले, विद्यापीठाचा वीजेवरील खर्च कमी करण्यासाठी पर्यावरणाचे जतन करण्याकरिता विद्यापीठात सौरउर्जा प्रकल्प राबविण्याचा निर्णय कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांचे अध्यक्षतेखालील कुलसचिव

डॉ. अजय देशमुख, तत्कालीन वि. व ले. अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, उपयोजित परमाणू विद्युत विभागाचे विभागप्रमुख डॉ. संजय डुडूल, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, वीज वितरणचे कार्यकारी अभियंता श्री डी.बी. मोहोड, श्री सौरभ माळी, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री हेमंत पाटील, विधी उपकुलसचिव श्री मंगेश जायले या सदस्यांचा समावेश असलेल्या समितीने विविध सभेच्या माध्यमातून प्रकल्पाबाबत अभ्यासपूर्ण योजना प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी तयार केली. व्यवस्थापन परिषदेने करार व त्यानुषंगीक मान्यता या प्रकल्पाला प्रदान केली. कुलगुरुंचे मार्गदर्शनाखाली तयार झालेला सौरउर्जा प्रकल्प भौतिकशास्त्र विभाग (११५.२० किलोवॅट), ग्रंथालय विभाग (१८५.६० किलोवॅट), जीवतंत्रशास्त्र विभाग (६४.० किलोवॅट), वनस्पतीशास्त्र विभाग (५१.२ किलोवॅट), शिक्षण विभाग (३२.० किलोवॅट), रसायनशास्त्र विभाग (३२.० किलोवॅट), मूल्यांकन भवन (९६.० किलोवॅट) या इमारतींच्या छतावर मे. क्लीन मॅक्स एनव्हायरो एनर्जी सोलुशन्स प्रा.लि., मुंबई या एजन्सीमार्फत स्थापित होणार असून भविष्यात याचे विस्तारीकरण आणि उर्जा संवर्धनाची इतर कामे होणार असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे नंतर हा प्रकल्प अमरावती विद्यापीठात कार्यान्वित होत असून पुणेनंतर सर्वात मोठा प्रकल्प संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा असणार आहे. हा प्रकल्प राबविण्यासाठी विविध अळथडे पार करुन एका वर्षाच्या आत प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचेही ते म्हणाले. सदर्हू प्रकल्पाचे काम एका महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती मे. क्लीन मॅक्स एनव्हायरो एनर्जी सोलुशन्स प्रा.लि. मुंबई चे चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर श्री राहूल शेळके यांनी दिली.

प्रकल्पाचा श्रीगणेशा नारळ फोडून कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे यांनी प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता वरीष्ठ अधिकारी व प्राधिकारिणींच्या मार्गदर्शनाखाली अभियांत्रिकी विभागातील अभियंता व कर्मचाऱ्यांनी तसेच कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. संचालन व्य.प. सदस्य डॉ.एस.के. ओमनवार यांनी केले. उद्‌घाटन कार्यक्रमाला विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, डॉ. प्रसाद वाडेगांवकर, डॉ. संजय डुडूल, डॉ. गजानन मुळे, सहा. कुलसचिव श्री आर.जे. सयाम, मालमत्ता अधिकारी श्री राजेश उपाध्ये, अभियंता वर्ग श्री गजानन वनस्कर, श्री आकाश सोळंके, श्री विजय चवरे तसेच विभागातील श्री रामेश्वर घेवारे, श्री पंकज ठाकूर व विभागातील विद्यार्थी, कंपनीचे प्रकल्प अभियंता श्री ऋषीकेश धर्माळे व त्यांचे इतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. १५/०६/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी